## महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ जून २००५

### अधिसूचना

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८.**

क्रमांक मुद्रांक. २००५/प्र.क्र. २०४/म-१.— मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई ६०) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन उक्त अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची एकच्या अनुच्छेद ६ चा खंड (एक), अनुच्छेद ३३ चा खंड (ख) चा उपखंड (दोन), अनुच्छेद ४० चा खंड (ख) व अनुच्छेद ५४ चा खंड (दोन) अन्वये आकारणीयोग्य असलेले मुद्रांक शुल्कातून, शैक्षणिक कर्ज मिळविण्यासाठी एखाद्या विद्यार्थ्याकडून निष्पादित करण्यात आलेल्या कोणत्याही संलेखाला सूट देणे लोकहितास्तव आवश्यक आहे अशी त्याची खात्री झाल्यामुळे, याद्वारे, तशी सूट देत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**भा. सु. तायडे,**
शासनाचे अवर सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated 4th June 2005.

### *NOTIFICATION*

BOMBAY STAMP ACT, 1958.

No. Mudrank. 2005/CR-204/M-1.— In exercise of the powers conferred by clause (*a*) of section 9 of the Bombay Stamp Act, 1958 (Bom. LX of 1958), the Government of Maharashtra, being satisfied that it is necessary to do so in the public interest, hereby remits the stamp duty chargeable on any instrument, executed by a student, for availing educational loan, chargeable under clause (1) of article 6, sub-clause (*ii*) of clause (*b*) of article 33, clause (*b*) of article 40 and clause (*ii*) of article 54 of the Schedule I appended to the said Act

By order and in the name of the Governor of Maharashtra,

B. S. TAYADE,
Under Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

कोणत्याही संलेखावरील, विशेष करून, यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (१) मध्ये सविस्तर दर्शन केलेल्या संलेखावरील मुद्रांक शुल्क, त्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये त्या प्रत्येकासमोर विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत कमी करीत आहे.

अनुसूची

| संलेखाचे वर्णन (१) | मुद्रांक शुल्काचा दर (२) |
|---|---|
| गृहकर्ज मिळविण्यासाठी निष्पादित केलेला संलेख.--- | |
| (क) जर ते एक लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल | काही नाही. |
| (ख) जर ते एक लाख रुपयांपेक्षा अधिक असेल परंतु दहा लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल. | दर हजार रुपयांना किंवा त्याच्या भागाला दोन रुपये आणि पन्नास पैसे. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मा. सु. तायडे,**
शासनाचे अवर सचिव.